# डॉ. पंजाबराव देशमुख

## यांच्या विचार आणि कार्याची आजच्या काळातील प्रासंगिकता



शतकोत्तर रौप्य महोत्सव
१२५ वर्ष जयंती

भारताचे प्रथम कृषिमंत्री, शिक्षण महर्षी

**डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख**


संपादक

**डॉ. दिपाली श्रीराम घोगरे**

© संपादकीय / लेखक

ISBN- ९७८-९३-९२५७६-४५-४

पुस्तक :- डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचार आणि कार्याची आजच्या काळातील प्रासंगिकता

संपादक :- डॉ. दिपाली श्रीराम घोगरे

प्रकाशक :- अक्षरा पब्लिकेशन,
प्लॉट क्र. ४२ गोकुळधाम रेसिडेन्सी,
प्रेरणानगर, वांजोळा रोड, भुसावळ
जि. जळगाव महाराष्ट्र ४२५२०१

मो.क्र. :- ९४२१६८२६१२

www.aimrj.com
Email- akshrapublication@gmail.com

आवृत्ती :- प्रथम, 25 ऑक्टोबर 2024

मुद्रक :- अक्षरा प्रिंटर्स, भुसावळ
किंमत :- २५०/-

**कॉपीराईट-** *हे पुस्तक आणि त्यातील सर्व सामग्री कॉपीराईट © 2024 संपादक / प्रकाशकाचे सर्व हक्क राखीव. या पुस्तकातील कोणतीही सामग्री संपादकाच्या / प्रकाशकाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही स्वरूपात, पूर्ण किंवा अंशतः पुनरुत्पादित, हस्तांतरित, किंवा वापरली जाऊ शकत नाही. या पुस्तकातील लेख किंवा विचार लेखकाचे स्वतःचे असून, संपादक किंवा प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतील असे आवश्यक नाही. जर कॉपीराईट उल्लंघनाचे कोणतेही प्रकरण आढळले, तर त्यासाठी पूर्णपणे संबंधित लेखकच जबाबदार राहील.*

# अनुक्रमणिका


01 डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख- बहुआयामी राष्ट्रीय महापुरुष 15

**प्राचार्य डॉ.किरण शं. खंडारे**

02 डॉ. पंजाबराव देशमुख : एक द्रष्टा पुरोगामी योद्धा 19

**डॉ. श्रद्धा थोरात**

03 डॉ.पंजाबराव देशमुखांचे कृषी विषयक विचार 30

**प्रा. डॉ. विकास बी. चांदजकर**

04 डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे मूल्यमापन 37

**प्रा. अमोल भाऊरावजी बंड**

05 डॉ. पंजाबराव देशमुखांचे ग्रामीण औद्योगिकरण विषयक विचार 43

**डॉ. सविता विठठ्लराव निचीत**

06 शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख (भाऊसाहेब) 48

**प्रा.अतुल विखे**

07 डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विवेकवादी विचार 53

**डॉ. व्ही. जी. वसु**

08 डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे भारतीय कृषी अर्थव्यवस्था विषयक विचार 59

**प्रा. हर्षद एकबोटे**

09 डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक कार्ये 63

**प्रा. अविनाश रामकृष्ण पवार**

10 महामानव युगपुरूष लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुखांचे शैक्षणिक कार्य 71

**डॉ. चंद्रकांत बाबनराव धुमाळे**

# 3.

# डॉ.पंजाबराव देशमुखांचे कृषी विषयक विचार

**प्रा. डॉ. विकास बी. चांदजकर**
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम

---

**सारांश-**

महाराष्ट्रातील एक शिक्षण प्रेमी, तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते व भारताचे पहिले कृषीमंत्री शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख हे विदर्भातील एक लोकोत्तर व्यक्तित्त्व होते. त्यांचे कार्यक्षेत्र मूलतः विदर्भ असले तरी त्यांची दृष्टी केवळ राष्ट्रव्यापी नव्हे तर वैश्विक होती. त्यांच्या कार्याचा अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे शेतकऱ्यांच्या विकासाचा त्यांनी घेतलेला ध्यास होय. त्यासाठी त्यांनी शेतकरी संघाची स्थापना केली. शेतकरी संघाच्या प्रचारासाठी महाराष्ट्र केसरी वर्तमानपत्र चालविले. त्याचप्रमाणे भारत कृषक समाजाची स्थापना व त्याच्याच विद्यमाने राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना केली.

**प्रस्तावना –**

डॉ पंजाबराव शामराव देशमुख 27 डिसेंबर 1898 - 10 एप्रिल 1965 ज्यांना भाऊसाहेब देशमुख म्हणूनही ओळखले जाते, ते एक सामाजिक कार्यकर्ते आणि भारतातील शेतकऱ्यांचे नेते होते. 1954 मध्ये जवाहरलाल नेहरूंच्या मंत्रिमंडळात ते कृषी मंत्री होते. त्यांनी आपली प्रतिभा आणि ऊर्जा शेती आणि शेतकरी यांना समृद्ध करणारी धोरणे तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी समर्पित केलीत्यांनी भारत कृषक समाजाची स्थापना केली . आणि1955 मध्ये फूड फॉर मिलियन्स नावाची मोहीम सुरू केली त्यांनी .1958 मध्ये जपानी भातशेतीची पद्धत सुरू केली आणि 1959 मध्ये जागतिक कृषी मेळा आयोजित आयोजित केलेल्या मेळाव्याला अमेरिकेचे अध्यक्ष यांच्यासह जगभरातील मान्यवरांनी भेट दिली.

## डॉ.पंजाबराव देशमुखांचे कृषी विषयक विचार

डॉ.पंजाबराव देशमुख यांचा जन्म 27 डिसेंबर 1898 मध्ये अमरावती जिल्ह्यातील पापड या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. पापड सारख्या लहानशा खेड्यातल्या सामान्य शेतकऱ्यांच्या घरात जन्माला आलेल्या या कृषकपुत्राने स्वतः उच्च विद्याविभूषित होऊन कर्तव्यभावनेने खेड्यापाड्यातल्या सहस्रावधी शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे उघडून दिली. शेतकरी कुटुंबात जन्मल्याने भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनातील सुख-दुःख, दारिद्र्य, अडी-अडचणी त्यांनी स्वतः अनुभवल्या होत्या. त्यातूनच त्यांचे कृषी विकासाचे ध्येय आकाराला आले होते. लोकांचे दारिद्र्य आणि अज्ञान दूर करणे व भारताचा सर्वांगीण विकास साधणे हे त्यांचे ध्येय होते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील 80 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत हे लक्षात घेऊन भाऊसाहेबांनी कृषी विकास हाच भारतीय प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा ठरविला आणि आपले सर्व प्रयत्न, सर्व जीवन त्याकरिता खर्ची घातले. शेतकऱ्यांना दारिद्र्यातून मुक्त केल्याशिवाय कृषक समाज व देश समृद्ध होणार नाही आणि स्वतंत्र बनणार नाही असे त्यांना वाटे. शेतकरी व शेतमजूर भारतीय समाजव्यवस्थेचा, अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे जाणूनच त्यांनी त्यांच्या उद्धारासाठी कार्य केले. भारतीय शेतकरी क्रांतीला एक नैसर्गिक आणि सामाजिक घटना म्हणून डॉ.पंजाबराव देशमुख यांनी मानले. जिथे उत्पादकांचे दारिद्र्य आहे तेथे समाजाचा नाश आहे, अधोगती आहे. म्हणून राष्ट्रीय दारिद्र्य नष्ट करण्यासाठी कृषक क्रांतीचा मार्ग डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी अनुसरला होता. जगामध्ये अनेक लोकचळवळी व जन आंदोलने झालीत, परंतु या सर्व चळवळी व आंदोलने त्यावेळच्या एखाद्या विशिष्ट सामाजिक किंवा धार्मिक प्रश्नांशी निगडित होत्या. स्वातंत्र्यापूर्वी भारतात झालेल्या चळवळी सुद्धा मुख्यता राजकीय व सामाजिक होत्या. या सर्व चळवळींमध्ये कुठेही शेती व्यवस्था व अन्नदाता शेतकरी केंद्रस्थानी असलेला दिसत नाही. शेतकऱ्यांची दुष्काळ, नापिकी व शेतीसाठी घेतलेल्या कर्जापायी सावकार वर्गाकडून होत असलेली पिळवणूक, त्याद्वारे होणारे हालअपेष्टा दूर करणे व त्यांना जाचातून मुक्त करण्याची व्यवस्था उभी करणे याकडे स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी कोणीही लक्ष दिले नव्हते. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी अशी चळवळ भारतात प्रथमच उभी केली. त्यांची ही लोक चळवळ कृषी विकास, शिक्षण व्यवस्था व सामाजिक सुधारणा या

त्रिसूत्रीवर आधारित होती. याकरिता त्यांनी आपले सर्व आयुष्य, आपली जमीन, पैसा, विद्वत्ता, प्रतिष्ठा या चळवळीत झोकून दिली. भाऊसाहेब लोक नेते होते. त्यांनी शेती विकासाच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जाऊन त्याला विकसित तंत्रज्ञान देऊन, समजावून सांगून, शेती उत्पादन वाढविण्यास प्रवृत्त केले. भाऊसाहेबांना अभिप्रेत असलेली कृषी क्रांती केवळ आर्थिक विकासावर अवलंबून नव्हती, तर समाजाच्या सर्वांगीण विकासावर आधारित होती. वैज्ञानिक दृष्टी आणि बुद्धिवादाची कास धरल्याशिवाय कोणतीही क्रांती यशस्वी होत नाही अशी विचारधारा बहुजन समाजात निर्माण करण्यासाठी त्यांनी श्री शिवाजी लोकविद्यापीठाची स्थापना केली व ग्रामीण बहुजनाला आत्मनिर्भर होण्याची प्रेरणा दिली. डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक, सामाजिक व कृषी क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. कृषिमंत्री होण्यापूर्वीही तसेच भारताचे कृषिमंत्री व काही काळ सरकार मंत्री या नात्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अन्न, कृषि, वन, मत्स्योत्पादन, ग्रामीण पुनर्रचना व कृषी उत्पादकांचे संघटन या क्षेत्रातील त्यांचे कार्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरले आहे. शेतकऱ्यांची कर्जातून मुक्त करणारा "कर्ज लवाद कायदा" पारित करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळेच त्यांना हिंदुस्थानच्या कृषक क्रांतीचे जनक म्हणतात. त्यांनी आपल्या जीवनात शिक्षण, कृषी, समाजसेवा, संसदीय कामकाज, ग्रामविकास या क्षेत्रात केलेले केलेले कार्य खूप महत्वपूर्ण आहे. पण त्यांच्या कार्याचा अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे शेतकऱ्यांच्या विकासाचा त्यांनी घेतलेला ध्यास होय. त्यासाठी त्यांनी शेतकरी संघाची स्थापना केली. शेतकरी संघाच्या प्रचारासाठी महाराष्ट्र केसरी वर्तमानपत्र चालविले. त्याचप्रमाणे भारत कृषक समाजाची स्थापना व त्याच्याच विद्यमाने राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना केली. कृषी क्षेत्रातील विकासासाठी त्यांनी 1960 मध्ये दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविले. भारताचे पहिले कृषीमंत्री म्हणून 1952 ते 1962 पर्यंत त्यांनी शेती व शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारक कार्य केले. त्यांच्या या महान कार्यामुळे कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण परिवर्तन घडून आले. शिक्षण क्षेत्रात श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रूपाने त्यांनी खरेखुरे लोकविद्यापीठ साकार केले. शेतकरी या एका आसाभोवती भाऊसाहेबांचे जीवन चक्र फिरत राहिले. शेतकऱ्यांसाठी कामे करीत त्यांचे आयुष्य गेले आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार करीतच त्यांनी दिनांक 10 एप्रिल 1965 रोजी देह ठेवला. भाऊसाहेबांचे जीवन म्हणजे

कृषकांसाठी केलेल्या क्रांतीचे महापर्व होय. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या निस्वार्थ कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने 1986 मध्ये त्यांना "कृषिरत्न" या पदवीने मरणोत्तर विभूषित केले. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषिविषयक विचारांचा व धोरणांचा आदर्श घेऊन व अवलंब करून आजच्या शेतकऱ्यांच्या व शेतीच्या समस्यांवर बदलत्या काळानुसार उपाययोजना करून शेतकरी हिताच्या दृष्टीने कृषी क्षेत्रात विकास व परिवर्तन करणे गरजेचे आहे. त्यातूनच शेती व शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकास साधता येईल व शेतीप्रधान भारत देशाला बळकट करता येईल.

केंद्रीय कृषीमंत्री असताना डॉ. पंजाबरावांनी भव्य दिव्य अशा जागतिक कृषी प्रदर्शनाचे नवी दिल्ली येथे 11 डिसेंबर 1959 ते फेब्रुवारी 1960 या दरम्यान आयोजन केले होते. अंदाजे 100 एकर जागेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांतीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले. देशाच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांचे लोढेंच्या लोंढे हे प्रदर्शन पाहण्यास व ज्ञान ग्रहण करण्यास उपस्थित राहू लागले. एक नवा क्रांतीचा विचार घेऊनच शेतकरी परतत होते. जवळपास दोन कोटी शेतकऱ्यांनी ही कृषी ज्ञानगंगा प्रत्यक्ष डोळ्यांनी अनुभवली. सर्वसामान्यच नव्हे तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर, इंग्लंडच्या महाराणी एलिझावेथ, रशियाचे पंतप्रधान बुल्गानिन, कम्युनिष्ट पक्षाच्या सर्वेसर्वा निकिता कुश्चेव आदी देश-विदेशातील गणमान्य मंडळी व भारताचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू, राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी या ऐतिहासिक कृषी प्रदर्शनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. कृषी-क्रांतीचा उषःकाल निश्चित होणार असा विश्वास त्यावेळी संपूर्ण शेतकरी बांधवांमध्ये निर्माण झाला. पंजाबपासून तर कन्याकुमारीपर्यंत शेतकऱ्यांचे जबरदस्त संघटन उभे झाले. पंजाबचे शेतकरी तर 'हमारा पंजाबराव पंजाबदा' असे संबोधू लागले. त्याचवेळेस खऱ्या अर्थाने कृषिक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. एकंदरीत डॉ. पंजाबरावांनी या प्रदर्शनाच्या माध्यमातून भारतीय शेतकऱ्याला जागतिक दर्जा मिळवून दिला. जगात मानाचे स्थान प्राप्त करून दिले. या देशातील शेतकरी आणि शेतमजूर हा भारताचा राजा झाला पाहिजे हे भाऊसाहेबांचे स्वप्न होते.

**भारत कृषक समाजाची स्थापना :**

शेतकरी स्थिती सुधारणा करण्यासाठी त्यांनी 'भारत कृषक समाज' या संस्थेची स्थापन केली. त्यांनी समाजाचा अधिवक्ता असण्याचं धोरण

राबविण्यासाठी 'महाराष्ट्र केसरी' हे वृत्तपत्र सुरू केले. डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी 7 फेब्रुवारी 1955 रोजी भारत कृषक समाजाची स्थापना करून संपूर्ण शेतकरी समाजाला राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ निर्माण करून दिले. संघटनेच्या बळावर कामगारांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वजण फायदे पदरात पाडून घेतात. मात्र शेतकरी वर्ग असंघटित असल्यामुळे तो सर्वच बाबतीत लुबाडला जातो. संपूर्ण जगाला अन्नधान्याचे बाबतीत स्वयंपूर्ण करण्याची प्रचंड ताकद या बळीराजात असताना स्वतः तो आणि त्याचे कुटुंब अर्धपोटी-अर्धनग्न असावे हे कटुसत्य डॉ. पंजाबरावांनी ओळखून भारतात एकूण लोकसंख्येच्या 75 टक्के शेती करणाऱ्या भारतीय किसानाकरिता भारत कृषक समाज या राष्ट्रव्यापी संघटनेची स्थापना करून शेतकऱ्यांना एक स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करून दिले. डॉ. पंजाबरावांनी भारत कृषक समाज ही संपूर्ण शेतकरी समाजाला उपलब्ध करून दिलेली फार मोठी देणगी आहे. भारत कृषक समाजाचे राष्ट्रीय कार्यालय नवी दिल्ली येथे आहे.

**भाऊसाहेबांच्या नावाने अकोल्यात कृषी विद्यापीठ :**

कृषी औद्योगिकीकरण व शेतकरी सक्षमीकरणासाठी हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात पहिल्यांदाच चार कृषी विदयापिठाची स्थापना केली. त्यापैकी असलेले हे एक कृषी विद्यापीठ. कृषी विदयापिठ स्थापनेत वसंतराव नाईक यांची फार मोठी दूरदृष्टी होती. शेती आणि शेतकऱ्यांवरील त्यांच्या निर्व्याज प्रेमातून देशात पहिल्यांदाच ही कृषी विद्यापीठ उभारली गेली. महाराष्ट्रातील प्रादेशिक समतोल साधत वसंतराव नाईक सरकारने अकोला येथे 20 ऑक्टोबर 1969 ला कृषी विद्यापीठ स्थापन केले. या विद्यापिठास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात आले आहे. विद्यापिठ कायदा 1983 अन्तर्गत विदर्भातील 11 जिल्ह्यात कृषी शिक्षण, शोध आणि बिज कार्यक्रम आदीचे कार्य विद्यापिठावर सोपवण्यात आले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना विदर्भातच व्हावी याकरिता 1968 साली आंदोलन उभारण्यात आले होते. या आंदोलनातील सहभागी आंदोलकांनी 20 ऑगस्ट रोजी अमरावती येथे उग्र निदर्शने केली होती. विद्यापीठ आंदोलकांना रोखण्यासाठी झालेल्या गोळीबारात नरेंद्र देशमुख, सुरेश भडके, भिरुमल रिझुमल, सुरेश कुऱ्हे, प्रफुल्लचंद्र कोठारी, गजानन देवघरे, नेमीचंद गोपाल, सुरेश वानखडे, शेख रफिक शहीद झाले तर असंख्य विदर्भवीर जखमी

झाले. या शहिदांच्या बलिदानानंतर विदर्भाच्या शेती क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी पंजाबराव कृषी विद्यापीठाची स्थापना अकोला येथे 20 ऑक्टोबर 1969 रोजी झाली. देशाच्या कृषी क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या पंजाबराव देशमुख यांची कर्मभूमी असलेल्या पश्चिम विदर्भातील अकोल्यात हे विद्यापीठ स्थापन झालं. अन भाऊसाहेबांच्या कार्याला सलाम करण्यासाठी या विद्यापीठाला 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ' हे नाव देण्यासाठीच्या जनरेट्याचा सरकारने सन्मान करीत भाऊसाहेबांचं नाव अकोला कृषी विद्यापीठाला दिलं.

**भाऊसाहेबांच्या आयुष्यातील महत्वा घटना :**

1. 1926 : 'मुष्टिफंड'या माध्यमातून गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी श्रद्धानंद छात्रालय काढले.
2. 1927 : शेतकरी संघाची स्थापना
3. 1927 : शेतकरी संघाच्या प्रचारासाठी 'महाराष्ट्र केसरी' हे वर्तमानपत्र चालविले.
4. वैदिक वाङ्मयातील धर्माचा उद्गम आणि विकास' या प्रबंधाबद्दल डॉक्टरेट.
5. 18 ऑगस्ट 1928 : अमरावती अंबाबाई मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे म्हणून सत्याग्रह .
6. 1930 : प्रांतिक कायदे मंडळावर निवड. शिक्षण, कृषी, सहकार खात्याचे मंत्री
7. 1932 : श्री. ए. डब्ल्यू. पाटील यांच्या सहकार्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना.
8. ग्रामोद्धार मंडळाची स्थापना.
9. 1933 : शेतकऱ्यांची कर्जातून मुक्तता करणारा कर्ज लवाद कायदा पारीत करण्यात मोठा वाटा. त्यामुळे त्यांना हिंदुस्थानच्या कृषक क्रांतीचे जनक म्हणतात.
10. 1950 : लोकविद्यापीठाची स्थापना (पुणे), त्याचे नंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात रूपांतर झाले.
11. 1955 : भारत कृषक समाजाची स्थापना व त्याच्याच विद्यमाने 'राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना.
12. 1956 : अखिल भारतीय दलित संघाची स्थापना.
    लोकसभेवर 1952, 1957, 1962 तीन वेळा निवड.

13. 1962 ते 1962 केंद्रीय मंत्रिमंडळात कृषिमंत्री. भारताचे पहिले कृषिमंत्री.
14. देवस्थानची संपत्ती सरकारने ताब्यात घेऊन विधायक कार्य करावे या उद्देशाने 1932 मध्ये हिंदू देवस्थान संपत्ती बिल मांडले.
15. प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राथमिक शिक्षक संघाची स्थापना.
16. 1960 : दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरवले.
17. 1965 : 10 एप्रिल 1965 रोजी निधन

संदर्भ


1. आनंद डॉ. पाटील, धर्माचा वैदिक वाङमयातील उदय आणि विकास, आनंद ग्रन्थसागर प्रकाशन कोल्हापुर
2. esaka.com,Date-27/12/2023
3. https://amravati.gov.in/national-saint/panjabrao
4. रिढे नितिन, लोकनेते डॉ पंजाबराव देशमुख, अमरावती,2010
5. नागपुरे ना. पा., विविध गुणदर्शन डॉ पंजाबराव देशमुख, अमरावती,1965
6. कोलारकर डॉ. श. गो. आधुनिक विदर्भाचा इतिहास. मंगेश प्रकाशन, नागपुर, 2005